
महा न्यूज & व्ह्यूज 1 8 SEP 2025

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे जयंती




**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**
शिवाजी विद्यापीठात आज प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ.रविंद्र भणगे, डॉ.प्रकाश पवार, डॉ.तानाजी चौगुले, डॉ.रामचंद्र पवार, डॉ.शरद बनसोडे, डॉ.प्रमोद पांडव, डॉ.सुखदेव उंदरे, डॉ.नेहा वाडेकर, डॉ. दत्तात्रय सावंत, डॉ.जयश्री कांबळे यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज

18 SEP 2025

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सुधारणावाद हेच भारतीय संविधानाचे तत्वज्ञान : डॉ. टी. एस. पाटील

कोल्हापूर (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज ):

धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सुधारणावाद हेच भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान आहे, आपण ते अंगिकारले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि डॉ, बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संविधान उद्देशिका' या विषयावतील विशेष व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. भारतीय संविधान अमृतमहोत्सव वर्षानिमित्त या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.




डॉ. पाटील म्हणाले, भारतीय संविधानाबद्दल देशात साक्षरता निर्माण होणे आवश्यक आहे. आपल्या संविधानाची उद्देशिका आम्हांला आमचा देश कसा निर्माण करायचा आहे, हे सांगते. विषमता तत्त्वाला नकार देऊन समतातत्त्वाचा अंगिकार करण्याची गरज ती व्यक्त करते. या देशात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानात अत्यंत महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे. राज्यघटनेतील मुलभूत अधिकार हा महत्त्वाचा घटक आहे. मुलभूत कर्तव्यांचे आपण पालन केले पाहिजे. सार्वजनिक संपत्ती व मालमत्तांचे संरक्षण करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. संविधानाने प्रत्येकाला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. या संविधानाचे पालन व रक्षण सर्व भारतीयांनी प्राणपणाने केले पाहिजे.

यावेळी डॉ. रामचंद्र पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. यशोधन बोकील यांनी परिचय करून दिला. श्री. रविंद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले. व्याख्यानास अविनाश भाले, उदय घाटे, सुधाकर भोसले, वसंत सिंघन, डॉ. किशोर खिलारे, डॉ. अनमोल कोठडिया, आर. एम. जाधव, यश आंबोळे, दत्ता घुटूकडे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात 'प्रबोधन'कार ठाकरे जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. दत्तात्रय सावंत, डॉ. जयश्री कांबळे यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# प्रबोधनकार ठाकरेंना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, तानाजी चौगुले, रामचंद्र पवार, शरद बनसोडे, प्रमोद पांडव, सुखदेव उंदरे, नेहा वाडेकर, दत्तात्रय सावंत, जयश्री कांबळे आदी उपस्थित होते.

सकाळ

## दृष्टिक्षेपात

# खासदार सुप्रिया सुळे यांचे मंगळवारी व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे मंगळवारी (ता. २३ सप्टेंबर) सकाळी अकरा वाजता खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याख्यान होणार आहे. 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने आणि संधी' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. या व्याख्यानावेळी अध्यासनातर्फे 'कोल्हापुरातील कर्तृत्वान स्त्रिया : भाग दोन' या पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष सरोज पाटील, विजया पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती या अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी दिली.

सकाळ

# समाजपरिवर्तनात संतांचे मोठे योगदान

## डॉ. इस्माईल पठाण : 'शहाजी' त कोरगावकर व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : 'महाराष्ट्राच्या समाज जीवन, समाज परिवर्तनात संतांचे मोठे योगदान आहे,' असे प्रतिपादन इतिहास संशोधक प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातर्फे विठ्ठल रामजी शिंदे सभागृहात प्रभाकरपंत कोरगांवकर व्याख्यानमालेअंतर्गत 'महाराष्ट्राचे समाजजीवन व परिवर्तन' यावर डॉ. पठाण बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. श्रीमती पल्लवी कोरगांवकर प्रमुख उपस्थित होत्या. प्रभाकरपंत कोरगावकर दानशूर व्यक्तिमत्त्व होते. समाज परिवर्तनाचे ते मोठे माध्यम होते, असे सूर मान्यवरांनी काढले. प्रारंभी मराठी विभागातर्फे 'समाज परिवर्तन' भित्तीपत्रकाचे तसेच शिवाजी ग्रंथालयातर्फे महाराष्ट्रातील समाज सुधारकांवरील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

### भजन, कीर्तनातून प्रबोधन

**डॉ. पठाण म्हणाले, 'मराठ्यांचे आचार-विचार शहाणपणाचे, भूतदया आणि दातृत्व असणारे आणि सर्वांशी प्रेमाने वागणारे होते. या समाज जीवनात बारा बोलुतेदार, १८ अलुतेदार आणि शेतकऱ्यांनी खेडी स्वयंपूर्ण केली होती. या समाज जीवनाला स्थिर ठेवण्याचे आणि लोकांचे जीवन निराशेतून आशावादाकडे नेणारे विचार संतांनी मांडले. अंधश्रद्धा, जातिवादाला मूठ माती देत त्यांनी विचाराचे प्रबोधन भजन, कीर्तन, प्रवचन यातून केले. छत्रपती शिवरायांनी सर्वांना एकत्रित करून स्वराज्याचा विचार समाजामध्ये पेरला.**

पेशव्यांच्या काळापासून पुढे अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातीभेद वाढत गेला. पुढे इंग्रज पोर्तुगीज डच फ्रेंच यांनी व्यापाराच्या माध्यमातून आर्थिक शोषण केले. सत्ताही काबीज केली.'

प्राचार्य डॉ. शानेदिवाण म्हणाले, 'प्रभाकरपंत यांनी महात्मा गांधींचे विचार आपल्या आचरणातून पुढे नेले.' पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, 'प्रभाकरपंत कोरगावकर यांची राहणी साधी होती. पण, त्यांचे दातृत्व मोठे होते. दान देतानासुद्धा ते कुणालाही कळू देत नसत. त्यांनी आपल्या वाट्याची सर्व संपत्ती कोरगावकर ट्रस्टच्या माध्यमातून समाजच्या मालकीची केली.'


कोरगावकर ट्रस्टचे सचिव विजय हिंगे, आंतरभारती शिक्षण संस्थेचे सहसचिव भरत शास्त्री, सचिव एम. एस. पाटोळे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. डी. के. वळवी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रचना माने, डॉ. पी. बी. पाटील यांनी संयोजन केले. डॉ. पल्लवी कोडक यांनी आभार मानले.

18 SEP 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कलेतील ज्ञान पवित्र प्रवाही असलं पाहिजे’

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आपल्या गुरूंवर श्रद्धा असली पाहिजे, केवळ प्रसिद्धीची अपेक्षा न करता विद्यार्थ्यांनी सातत्याने नृत्यसाधना केली पाहिजे. ‘कलेतील ज्ञान हे पवित्र व प्रवाही असलं पाहिजे, असे मत भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. स्वाती दैठणकर यांनी व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात नर्तन उत्सवाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. विनोद ठाकूर देसाई, नर्तना स्कूलच्या संचालिका कविता नायर या उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : नर्तन महोत्सवात भरतनाट्यम सादर करताना डॉ. स्वाती दैठणकर.**

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, लहान मुलगी ज्याप्रमाणे स्वतःच्या आनंदासाठी स्वतःच मोर बनू पाहते, तसे कलाकाराने असले पाहिजे. वित्त व लेखाधिकारी मा.डॉ. सुहासिनी पाटील यांनी मानसिक आरोग्यासाठी संगीत व नृत्य शिकणे आवश्यक असल्याचे सांगितले. या महोत्सवात नृत्य शिबिरात सहभागी नंदिता नायर, वैभवी चोपडे, स्वराली कडू, दीक्षा मोरे,श्रीमती नीलम येसाटे, आर्या उपाध्याय, समृद्धी शिंदे, वंशिका मुसळे, गीतीका पर्चानी, राशी देशपांडे, राधिका संजय पवार, स्वरा श्रीधर काळभैरव, अक्षरा खाबिया, एलेन रॉड्रिग्स, ऋतिक्का मगदुम, स्वरा कुसळे, प्रीती रमेश कुंभार, रुजवी पाटील, समिधा सौरभ प्रभुदेसाई, अपूर्वा घाटगे, समीक्षा संदीप घोरपडे, समीक्षा सोमनाथ शिंदे, युथिका अरविंद, मीनल देसाई, रुजवेदी संतोश चिकणे, समृद्धी अमर जावरे, आकांक्षा संजय रासळ यांनी भरतनाट्यम नृत्यातील नरसिंह कृती, अभंग आदी अनेक प्रकार सादर केले.

सकाळ

# सुधारणावाद हेच भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान

## डॉ. टी. एस. पाटील; शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सुधारणावाद हेच भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान आहे, आपण ते अंगिकारले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे भारतीय संविधान अमृतमहोत्सव वर्षानिमित्त आयोजित 'संविधान उद्देशिका' या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, 'भारतीय संविधानाबद्दल देशात साक्षरता निर्माण होणे आवश्यक आहे. आपल्या संविधानाची उद्देशिका आम्हाला आमचा देश कसा निर्माण करायचा आहे, हे सांगते. विषमता तत्त्वाला नकार देऊन समतातत्त्वाचा अंगिकार करण्याची गरज ती व्यक्त करते. या देशात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानात अत्यंत महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत. राज्यघटनेतील मूलभूत अधिकार हा महत्त्वाचा घटक आहे. मूलभूत कर्तव्यांचे आपण पालन केले पाहिजे. सार्वजनिक संपत्ती व मालमत्तांचे संरक्षण करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. संविधानाने प्रत्येकाला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. या संविधानाचे पालन व रक्षण सर्व भारतीयांनी प्राणपणाने केले पाहिजे.'

यावेळी अविनाश भाले, उदय घाटे, सुधाकर भोसले, वसंत सिंघन, किशोर खिलारे, अनमोल कोठडिया, आर. एम. जाधव, यश आंबोळे, दत्ता घुटूकडे उपस्थित होते. डॉ. रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. यशोधन बोकील यांनी परिचय करून दिला. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना डॉ. टी. एस. पाटील.

18 SEP 2025
तरुण भारत

# खासदार सुळे यांचे मंगळवारी शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने खासदार सुप्रिया सुळे यांचे मंगळवारी, २३ रोजी सकाळी ११ वाजता व्याख्यान होणार आहे. 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने आणि संधी' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या सरोज पाटील, विजया पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, तरी शिक्षक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 8 SEP 2025 तरुण भारत

# वैज्ञानिक दृष्टीकोनच संविधानाचे तत्वज्ञान

## प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सुधारणावाद हेच भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान आहे, आपण ते अंगिकारले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी आयोजित व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. 'संविधान उद्देशिका" हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. भारतीय संविधान अमृतमहोत्सव वर्षानिमित्त याचे आयोजन केले होते.

डॉ. पाटील म्हणाले, भारतीय संविधानाबद्दल देशात साक्षरता निर्माण होणे आवश्यक आहे. संविधानाची उद्देशिका आमचा देश कसा निर्माण करायचा आहे, हे सांगते. ममतातत्त्वाचा अंगिकार करण्याची गरज ती व्यक्त करते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संविधानात अत्यंत महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत. मुलभूत कर्तव्यांचे आपण पालन केले पाहिजे. सार्वजनिक संपत्ती व मालमत्तांचे संरक्षण करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. संविधानाचे पालन व रक्षण सर्व भारतीयांनी केले पाहिजे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवचरी बोलताना डॉ. टी. एस. पाटील.

डॉ. रामचंद्र पवार यांनी स्वागत केले. प्रा. यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले. रविंद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी अविनाश भाले, उदय घाटे, सुधाकर भोसले, वसंत सिंघन, डॉ. किशोर खिलारे, डॉ. अनमोल कोठडिया, आर. एम. जाधव, यश आंबोळे, दत्ता घुटूकडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 8 SEP 2025 तरुण भारत

# विद्यापीठात 'संविधान दूत' कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संविधानातील मूल्ये समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्या दृष्टीने संविधान दूतांनी काम करणे अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संविधान दूत' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

डॉ. महाजन म्हणाले, तरुणाईला योग्य दिशा मिळाली. की त्यांचे जीवन योग्यरित्या घडते आणि पर्यायाने देश घडतो. संविधान दूतांनी सामंजस्याच्या मार्गाने संविधानातील मूल्यतत्त्वे समाजातील तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम करावे. अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक आहे. या कार्यशाळेमध्ये मिळालेल्या ज्ञानाचा वापर आपण राष्ट्र उभारणीसाठी केला पाहिजे.

कार्यशाळेच्या 'भारतीय संविधानाची ओळख' या पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील यांनी 'संविधान व त्याचे महत्त्व' आणि 'भारतीय संविधानाची प्रस्तावना व संवैधानिक मूल्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी 'लोकशाही, समता आणि न्याय' आणि 'मूलभूत हक्क व कर्तव्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. अविनाश भाले, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. भारती पाटील, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. दत्ता जाधव, डॉ. लखन भोगम, जॉर्ज क्रुझ आदी उपस्थित होते. डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकृष्ण महाजन. सोबत डॉ. तानाजी चौगुले, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठामध्ये प्रबोधनकार ठाकरे जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रविंद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. दत्तात्रय सावंत, डॉ. जयश्री कांबळे आदी उपस्थित होते.